CNRMHAH2500 1352 2020

<u>रे मु नं ४३७/२०२० मध्ये नि. ४० वर आदेश</u>
(मारुति अमृता डेरे वि. बाबासाहेब राजाराम डेरे व इतर)

सदरचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द निरंतर ताकिद मनाईसाठी दाखल केला आहे. प्रतिवादीने सदर दाव्यास त्यांची कैफियत दाखल केली आहे. कैफियत दिल्यानंतर वादीने प्रतिवादीवर हल्ले केलेले असून तशा स्वरुपाच्या फौजदारी केसेस दाखल झालेल्या आहेत. त्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थीतीचा विचार करता कैफियत देण्यापूर्वी जे वादी स्वतः प्रतिवादीस हरकत अडथळा करीत होते त्याबाबत प्रतिदावा करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादीने जरी दाव्याची कैफियत व अर्जाचे सविस्तर म्हणणे दिले असले तरी वादीविरुध्द नामई हुकूम मागणे गरजेचे असतानाही प्रतिवादीला प्रतिदावा दाखल करणे लक्षात न आल्यामुळे प्रतिदावा दाखल करण्याचे राहून गेले आहे. म्हणून प्रतिदावा दाखल करुन घ्यावा म्हणून सदरचा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादीचा दावा मिळकतीत कब्जा असल्याने त्याला बेदखल करण्यासाठी वादीने सदरचा दावा दाखल केला आहे. दि. १२/६/२०२१ रोजी वादीविरुध्द गंभीर स्वरुपाचा गुन्हा दाखल झालेला असून त्यात वादी क्र.१, त्याचा भाउ व मुलगा असे आरोपी आहेत. प्रतिवादीवर हल्ला केला त्यावेळी वादींचे हातात कोयता व काठया होत्या असे पंचनाम्यात आले आहे. तशी अशा परीस्थीमध्ये स्थावर मिळकतीविषयी प्रतिवादीने स्वतःचा कब्जा असल्याचे कैफियतीमध्ये मांडले आहे. म्हणून प्रतिवादीला वादीविरुध्द दावा करणे गरजेचे आहे. परंतु केवळ कैफियतीसोबत प्रतिदावा दाखल न केल्यामुळे तांत्रीक अडचण निर्माण झालेली आहे ती दूर करण्यासाठी प्रतिवादींचा सदरचा अर्ज आहे.

वादीने प्रतिवादीच्या अर्जाला नि. ४४ वर म्हणणे दाखल ककरुन प्रतिवादीचे सर्व कथन नाकारले आहे. वादीचे म्हणणे असे की, प्रतिवादींनी विस्तृत कैफियत दिलेली आहे परंतु त्यामध्ये कोठेही आणि अस्पष्टपणे देखील प्रतिदाव्याचा उल्लेख केलेला नाही. नि. ५ चे अर्जावर युक्तीवाद देखील केलेला आहे. त्यामध्ये देखील प्रतिदाव्याचा कोठेही उल्लेख नाही. प्रतिवादीने वादीविरुध्द कोयता व काठयांनी हल्ला केल्याबाबतची कथने खोटी आहेत. प्रतिवादींनी यापूर्वी संबंधित महसूल अधिकारी यांचेकडे त्यांचेवर दबाव आणून त्यांचे समोर उपोषण आणि आत्मदहनाची नोटीस देउन कोणतीही कायदेशीर प्रक्रिया न करता वादींची पीक पाहणी बदलून स्वतःची पीक पाहणी लावून घेतलेली आहे. तसेच वादीच्या खरेदीखताची नोंद रद्द करुन घेतली आहे व वादीचे खरेदीदार शोभा गजानन औटी यांचे नाव रेकॉर्ड ऑफ राइटला लावून घेतलेले आहे. प्रतिवादी हे जाणुनबूजून दाव्याचे कामकाज लांबविण्यासाठी प्रयत्न करतात. प्रतिदावा दाखल करण्याची मुदत कधीच संपलेली आहे. त्यामुळे सदरचा अर्ज रद्द होण्यास पात्र आहे.

प्रतिवादीचे वकिलांनी असा युक्तिवाद केला की प्रतिवादीने प्रतिदावा दाखल केला आहे. दाव्याचा व प्रतिदाव्याचे निकाल एकत्र होणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिदावा स्वीकारण्यात यावा. वादीचे वकिलांनी असा युक्तिवाद केला की प्रतिवादी यांनी त्यांची कैफियत दाखल केली आहे. कैफियत दाखल केल्यानंतर प्रतिवादी यांना प्रतिदावा दाखल करता येणार नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा.

वादी व प्रतिवादी यांचा युक्तिवाद विचारात घेण्यापूर्वी दिवाणी प्रक्रिया संहिता कलम आदेश ६ नियम ६अ पाहणे आवश्यक आहे.

> **Order VI Rule 6A** :- Defendant in a suit may, in addition to his right of pleading, a set-off under rule 6, set p, by way of counter-claim against the claim of the plaintiff, any right or claim in respect of a cause of action accruing to the defendant against the plaintiff either before or after the filing of the suit but before the defendant has delivered his defence or before the time limited for delivering his defence has expired, whether such counter claim is in the nature of a claim for damages or not.
> Provided that such counter-claim shall not exceed the pecuniary limits of the jurisdiction of the court.

आदेश ६ नियम ६अ मध्ये प्रतिवादी प्रतिदावा कधी दाखल करु शकतो हे दिले आहे. त्यामध्ये प्रतिवादी प्रतिदावा त्याला घडलेल्या कारणासाठी दाखल करु शकतो व ते कारण दावा दाखल करण्यापूर्वी अथवा दावा दाखल केल्यानंतर घडलेले असावे असे नमूद केले आहे. याठिकाणी मा. सर्वोच्च न्यायालयाचा अशोक कुमार कालरा वि. विंग सी डी आर सुरेंदर अग्नीहोत्री व इतर ***(***२०२०***)*** २ एस सी सी ३९४ हा न्यायनिर्णय पाहणे आवश्यक आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने असे मत नोंदवले आहे की प्रतिवादी प्रतिदावा हा मुद्दे काढेपर्यंत दाखल करु शकतो. या केसमध्ये प्रतिवादी यांनी त्यांची कैफियत दाखल केलेली आहे. या प्रतिदाव्यामध्ये प्रतिवादीने प्रतिदाव्यास कारण दि. १३/०१/२०२१ रोजी घडल्याचे नमूद केले आहे. सदरचे कारण दावा दाखल केल्यानंतर घडलेले आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना या दाव्याचे कामी प्रतिदावा दाखल करता येईल. त्यामुळे प्रतिवादींना प्रतिदावा दाखल करण्यास परवानगी देणे योग्य होईल. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

<u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. प्रतिदावा दाखल करुन घेण्यात यावा.

सही/-

दि. २०/०९/२०२१

(डी. आर. बडवे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पारनेर